**ठळक बातम्या**

- भारत आणि श्रीलंका यांच्यात ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य या महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार

- राज्यभरात रामजन्मोत्सवाची तयारी सुरू

- कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा

**आणि**

- प्रख्यात अभिनेते मनोजकुमार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या श्रीलंका दौऱ्यात आज दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांच्यात प्रतिनिधिमंडळ स्तरावर चर्चा झाल्यांनतर केलेल्या संयुक्त निवेदनात दोन्ही नेत्यांनी आपली भूमिका मांडली. प्रधानमंत्री मोदी म्हणाले…..

**होल्ड बाईट प्रधानमंत्री**

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना “श्रीलंका मित्र विभूषण” हा श्रीलंकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारताच्या ‘शेजारी देशांना प्राधान्य’ धोरणात आणि व्हिजन महासागर संकल्पात श्रीलंकेला विशेष स्थान असल्याचं सांगून प्रधानमंत्र्यांनी श्रीलंकेची वाटचाल प्रगतीपथाकडे होत असल्याबद्दल

समाधान व्यक्त केलं. भविष्यात दोन्ही देशांमधली भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. श्रीलंकेतल्या काही मंदिरांच्या निर्मितीसाठी भारत सहकार्य करेल, असं ते म्हणाले. भारताच्या सहकार्यानं श्रीलंकेत सुरु असलेल्या अनेक विकासकामांचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. प्रधानमंत्र्यांनी श्रीलंकेतले विरोधी पक्ष नेते सजित प्रेमदासा आणि तमिळ पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली.

**<><><><><>**

अनुरा कुमारा दिसानायके यांनी श्रीलंकेच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिला परदेश दौरा भारताचा केला होता तसंच दिसनायके यांनी पदभार स्वीकारल्यानंतर श्रीलंकेला भेट देणारे मोदी हे पहिलेच राष्ट्रप्रमुख आहेत, अशी माहिती परराष्ट्रव्यवहार विभागाचे सचिव विक्रम मिस्री यांनी दिली. दोन्ही राष्ट्रांमधले बंध दृढ असल्याचं यावरुन दिसून येतं असं ते म्हणाले. प्रधानमंत्री मोदी यांचा हा श्रीलंका दौरा विधायक परिणाम देणारा असल्याची प्रतिक्रीया त्यांनी दिली.

**<><><><><>**

छत्तीसगडमधला नक्षलवाद पुढच्या वर्षीच्या मार्चपर्यंत संपवण्याचा संकल्प सरकारनं केला असल्याचं गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. गृहमंत्री शहा आज त्यांच्या छत्तीसगड दौऱ्यादरम्यान बस्तर जिल्ह्यात दंतेवाडा इथल्या बस्तर उत्सवाच्या समारोप समारंभाला उपस्थित होते. माओवाद्यांनी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात येण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. छत्तीसगडच्या आदिवासी कला आणि हस्तकला यांना प्रोत्साहन दिल्याबद्दल त्यांनी बस्तर पांडुमचं कौतुक केलं. या तीन दिवस सुरु या उत्सवात आदिवासी नृत्य, लोकगीत, आदिवासी नाटक, वाद्ये, पोशाख, दागिने, हस्तकला आणि पाककृती अशा सात विषयांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या.

**<><><><><>**

रामनवमी निमित्त राज्यात अनेक ठिकाणी रामजन्मोत्सव साजरा होणार असून त्या दृष्टीने मंदिरांमधे तयारी सुरु आहे. **शिर्डी**मध्ये साईबाबा समाधी मंदिरात आजपासून रामनवमी उत्सवाला प्रारंभ झाला असून तो ७ एप्रिल पर्यंत चालणार आहे. या उत्सवानिमित्त मंदिरात फुलांची सजावट करण्यात आली असून मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. **गोंदिया** शहरात रामनवमीनिमित्त आज बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. श्रीराम मंदिरापासून सुरु झालेल्या या रॅलीत मोठ्या संख्येने युवकांनी भाग घेतला. अनेक ठिकाणी नागरीकांनी आपल्या घरासमोरुन रॅली जात असताना फुलांचा वर्षाव करत स्वागत केलं. **यवतमाळ** जिल्ह्यात रामनवमी उत्सवानिमित्त शोभायात्रेचं नियोजन असून त्यादृष्टीने पोलीस विभाग सज्ज झाला आहे. समाजमाध्यमांवर आलेल्या कोणत्याही आक्षेपार्ह विडिओ अथवा फोटोची पोलिसांकडून खातरजमा करण्याचं आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षकांनी केलं आहे. रामनवमी शोभायात्रा समितीनेही बजरंग दल आणि दुर्गा वाहिनीच्या कार्यकर्त्यांची सुरक्षा समिती गठीत केली आहे.

**<><><><><>**

रामनवमी निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या तामिळनाडूला भेट देणार असून रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पांबन रेल्वे पुलाचं उद्घाटन करणार आहेत. आकाशवाणीवरून या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असल्यानं आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र उद्या दुपारी एक वाजून पाच मिनिटांनी प्रसारित होईल.

**<><><><><>**

प्रभू श्रीराम हे आपले राष्ट्रपुरुष असून त्यांनी सांगितलेल्या मूल्यांची जोपासना करावी असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुंबईत मानखुर्द इथे संजोग देवस्थान प्राणप्रतिष्ठा आणि लोकार्पण कार्यक्रमप्रसंगी ते आज बोलत होते. प्रभू श्रीराम यांनी दाखवलेल्या सत्याच्या मार्गावर चालण्याचा आपण प्रयत्न

करावा, असं ते यावेळी म्हणाले. यावेळी विधानपरिषदेचे सदस्य प्रवीण दरेकर, इतर मान्यवर आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

<><><><>

राज्यातील धर्मदाय व्यवस्था ही एकाच ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणण्यात येणार असून ही व्यवस्था मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशीही जोडली जाणार आहे. जेणेकरून खाटांच्या उपलब्धतेची माहिती मिळेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये उपचार नाकारल्याने एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

<><><><>

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काल तुरळक ठिकाणी पाऊस झाला. येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. कोकणात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट राहील तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जना,विजांचा कडकडाट यासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाडा आणि विदर्भात या काळात हवामान कोरडं राहील.

<><><><>

प्रख्यात चित्रपट अभिनेते, दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या पवन हंस स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अभिनेता अमिताभ बच्चन, अभिषेक बच्चन, प्रेम चोप्रा, सलीम खान, रझा मुराद, राजपाल यादव, दिग्दर्शक सुभाष घई यांच्यासह मनोरंजनविश्वातले मान्यवर यावेळी उपस्थित होते. मनोज कुमार यांचं काल पहाटे खासगी रुग्णालयात वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झालं. देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे मनोज कुमार हे भारत कुमार या टोपणनावानेही ओळखले जात. वो कौन थी, शहीद, उपकार,

हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानासाठी त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, पद्मश्री पुरस्कार तसंच दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते डॉ. विलास उजवणे यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ६२ वर्षांचे होते. काही वर्षांपूर्वी त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना हृदयविकाराचाही त्रास जाणवू लागल्याने त्यांची प्रकृती खालावत गेली. उजवणे यांनी विविध चित्रपट आणि नाटकांसह, वादळवाट, चार दिवस सासूचे, दामिनी यांसारख्या लोकप्रिय मालिकांमधून विविध भूमिका साकारल्या होत्या.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यात आला आहे. या अनुषंगाने महसूल विभागाच्या १०० दिवस कृती कार्यक्रमासंबंधीच्या क्षेत्रीय कार्यशाळेचं कालपासून पुणे इथं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित केलं. १०० दिवसांचा कृती कार्यक्रम कार्यालयांमध्ये चांगल्या पद्धतीने सुरू असल्याविषयी त्यांनी समाधान व्यक्त केलं. महसूल विभागाच्या हस्तपुस्तिकेचेही यावेळी प्रकाशन करण्यात आले.

**<><><><><>**

राज्यातल्या निरीक्षणगृहांमधे हेल्प डेस्क स्थापन करण्याच्या उद्योजक अझीम प्रेमजी यांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. मुलांच्या हक्कांचं संरक्षण करणं, किशोरवयीन गुन्हेगारांचे पुनर्वसन, तसंच कायदेशीर सामाजिक समुपदेशन सेवा पुरवणं या डेस्कचा हेतू आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना सुरु आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दिल्ली कॅपिटल्सनं निर्धारित २० षटकांत ६ बाद १८३ धावा केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हां चेन्नई सुपर किंग्सच्या १८ षटकांत ५ बाद १३० धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**